## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/१०/२०१७

**१) चाकु सारख्या धारदार हत्याराने मारून जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/१०/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा जखमी मुलगा शिवम किशोर कटारे वय १७ वर्ष यास 'तु नेहमी माझ्या सोबत भांडण का करतोस' असे म्हणुन जखमीचे पोटावर, हातावर,डोक्यावर चाकु सारख्या धारदार हत्याराने मारून जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने, फिर्यादी किशोर टिकाराम कटारे वय ४० वर्ष रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गभने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) मुर्तीची विटंबना केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/१०/२०१७ चे १६.३० ते १६.४५ वाजता दरम्यान यातील हरदोली गावाचे हनुमान मंदिरातील हनुमंताचे मुर्तीची कोणीतरी अज्ञात इसमाने विटबंना केल्याने, फिर्यादी योगेश दादाजी फुंडे वय २७ वर्ष रा. हरदोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २९५ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**३) मारोती व्हॅनच्या धडकेत एक जखमी:–**

दिनांक १६/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा लंकेश वय ०९ वर्ष रा पोहरा ते गडेगाव रोडावर गोमासेच्या घरासमोर रोडाचे बाजुला ऊभा असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती व्हॅन क्र. एमएच ३१ एजी २३४० ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मुलास धडक मारून जखमीचे डाव्या पायाचे टोंगऱ्याचे खाली फॅक्चर केल्याने, व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने, फिर्यादी झकास दामोधर बोरकर वय ३३ वर्ष रा.यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादवी सहकलम १८४ १३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्णीकर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) जुण्या भांडणाचे कारणा वरून भांडण करून चाकुने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १५/१०/२०१७ चे २२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मनोज मन्साराम भुरे वय २६ वर्ष रा. पांढराबोळी हा चौकात ऊभा असतांना तेथील हजर असलेल्या यातील आरोपीने जुण्या भांडणाचे कारणा वरून वाद व शिवीगाळ करून चाबी सोबत असणाऱ्या लहान चाकुने कमरेवर डावे बाजुस मारून जखमी केल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**५) संगनमत करून लज्जास्पद शब्दात शिवीगाळ करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १६/१०/२०१७ चे ११.००वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी हीस आमची पोलीसात रिपोर्ट दिली आहे. या कारणा वरून यातील तिन्ही आरोपीतांनी फिर्यादीला लज्जास्पद शिवीगाळ करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) नदीचे पाण्यात बुडुन मुलाचा मृत्यु :—**

दिनांक १६/१०/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक अतुल राजु बनकर वय १६ वर्ष रा. भुगाव मेंढा हा आवाला लागुन असलेल्या चुलबंद नदीवर आंघोळ करण्यास गेला असता, नदीतील पात्राचे विहीरीमध्ये पाण्यात बुडुन मरण पावला असल्याने, फिर्यादी कैलाश कुसन बाच्छलकर वय ४१ वर्ष रा. भुगाव मेंढा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. चोले पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**७) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/१०/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोपी डिझायर वाहन ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध दारू अंडयावर धाडी . :—**

दिनांक १६/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन अडयाळ येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून ३० लिटर हातभट्टी दारू मोटार सायकल किमती ६३,०००/—रु चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १६/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती २९ केसेस करण्यात आले आहे.



(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.